● रविवार, दि. १ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १२३ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# निवडणुक हरलो, हिम्मत नाही - गोरंट्याल

## कटेंगे तो बटेंगे, पैसा फॅक्टर व धार्मिक ध्रुवीकरणामुळे पराभव, पुन्हा जोमाने काम करणार

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात एक स्टेडियम झाले दुसऱ्या एका स्टेडियमसाठी लढा देणार आहे, शहराला पाणी पुरवठ्यासाठी आंदालने उभारु असे म्हणत मी केवळ निवडणुक हरलो आहे, जनतेच्या मनातून हरलो नाही आणि हिम्मतही हरलो नाही. पन्नास नव्हे तर आता सत्तर खोक्यांचा हा विजय असल्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी माध्यमांशी म्हटले आहे.

पुढे बोलतांना गोरंट्याल म्हणाले की, मतदार संघात पैशांचा पाऊस पडला, प्रचंड प्रमाणात पैसा वाटल्या गेला, केवळ स्लम भागात पैसे वाटल्या जातात असा समज होता मात्र, ज्या ज्या ठिकाणी मी कामे केली त्या ठिकाणी अधिकचा पैसा ओतल्या गेल्या, जसे की, कडवंची गावात मी पुलं बांधला, सामणगावसह

जेथे जेथे नगर सेवक होते. त्या ठिकाणीही पैसा चालला. एज्युकेटेड लोकं सोडून सर्वांना पैसे दिल्याचा गंभीर आरोपही यावेळी माजी आ. गोरंट्याल यांनी केला. केवळ निवडणुक हरलो आहे, लोकांच्या मनातून हरलो नाही, पुन्हा जोमाने कामाला लागणार आहे. सत्ता हातात नसली तरी आम्हाला संविधानाने अधिकार दिले आहेत. जालनेकरांच्या प्रश्नांसाठी उपोषणे करू, आंदोलने करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या निवडणुकीत मला ७२ हजार मतदान मिळाले आहे, पैसे खर्च करून मतदान मिळाले नाही, हे माझ्या हक्काचे मतदान आहे, काँग्रेसची व्होटबँक असलेले मतदान मला झाले नाही. त्याच बरोबर पैशाचा महापूर, जातीय ध्रुवीकरण, कटेंगे तो बटेंगे याचाही परिणाम या निवडणुकीच्या निकालावर झाला. पेनवाला अपक्ष उमेदवार निवडून येतील असा विश्वास निर्माण करण्यात आला आणि यामुळे काही समजदार लोकांनी मुद्दाम हून शिवसेनेला मतदान केले. याबाबत अनेकांनी माझ्याशी चर्चा करतांना हे स्पष्ट केले. मुळात अपक्ष उमेदवाराच्या समाजाचे मतदान हे केवळ ५४ हजार आहे. त्यात ८० टक्के जरी मतदान झाले तर ते चाळीस हजार होईल आणि चाळीस हजारांवर निवडणुक जिंकता येत नाही. मात्र, त्यांच्या लोकांनी नव्वद हजारांवर मतदान असल्याचा फेक नरेटिव्ह पसरवला त्याचा फटका आपल्याला बसला. विरोधकांनी धार्मिक ध्रुवीकरण केल्याचं दिसून आलं. त्यामुळे हिंदूमध्ये भिती निर्माण झाली आणि विरोधकांना त्याचा फायदा झाला. त्याचवेळी काँग्रेसची पारंपरिक व्होट बँक मात्र विभागली गेली. त्यामुळे आपला पराभव झाल्याचे कैलास गोरंट्याल म्हणाले.

या पराभवामुळे खचून न जाता मतदारांच्या भेटी - गाठी घेण्यासाठी आपण घरातून बाहेर पडलो आहे. आता जालना महानगर पालिका आमचं लक्ष असणार आहे असेही गोरंटयाल यांनी स्पष्ट केलं.

ईव्हिएमवर शंका येत आहे. पक्षाकडुन त्या संदर्भात सुचना आल्या आहेत. ईव्हीएम विरोधात न्यायालयीन लढाई लढणार असल्याचेही गोरंट्याल यांनी योवळी सांगितले.



## महायुतीचा शपथविधी गुरुवारी

**मुंबई -** राज्यातील महायुती सरकारच्या नव्या इनिंगचा शपथविधी अखेर ठरला आहे. गुरुवार (दि ५ डिसेंबर) रोजी सायंकाळी ५ वाजता नव्या सरकारचा शपथविधी होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानमध्ये हा शपथविधी होणार आहे. महायुती सरकारच्या शपथविधीच्या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली आहे. मात्र मुख्यमंत्री कोण होणार हे मात्र अद्याप गुलदस्त्यात आहे. काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची तब्येत बिघडली, एकनाथ शिंदे शुक्रवारपासून साताऱ्यातील दरे गावात मुक्कामी आहेत. तब्येत बरी नसल्याने शिंदेंना आराम करण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिल्याची माहिती आहे.

युवा आदर्श

### हक्क ...

एकाचं जागे वरती
दोघा तिघांचा हक्क
उद्रेक तर होणारचं
ठरलं अगदी पक्क
निष्ठा जळते चुलीत
कार्यकर्त्यांचे दु:ख
मागून येणारे समोर
मागचे सगळे थक्क
तराजू उलटा सुलटा
अन्याय मुका मख्ख
राजकारणाचा गाडा
चालतो मजेत झक्क
खोटारडे कोण कसे
कळूनि जाते चक्क
दिसते काळोखातही
सूर्य प्रकाश रे लख्ख
स्पष्ट असूनही रे सत्य
सगळे विपरीत वक्क
शोधतो आता चष्मा
पडलायं अंधार घुक्क
कसे होई आत्मनिर्भर
आत्मविश्वासां शक्क
असख्ल चोख सोनेही
पितळे समोर फिक्क

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# बांगलादेशाची हिंदुविरोधी भुमिका आंतरराष्ट्रीय पटलावर ठेवा

## हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल यांच्याकडुन तहसीलदारांना निवेदन

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** बांगलादेशातील हिंदूसोबत सातत्याने घडणाऱ्या घटनांमुळे संपूर्ण हिंदू समाज दहशतीत आहे. पाकिस्तानातील हिंदूच्या दुरवस्थेनंतर आता बांगलादेशही पाकिस्तानच्या वाटेवर हिंदूबाबत दहशतवादी-जिहादी वर्तन करत आहे. शासन बदलाचे प्रयत्न बांगलादेशला इस्लामिक जिहादकडे वाटचाल सुरू ठेवण्यास प्रवृत्त करत आहेत. सध्याचे काळजीवाहू सरकार बांगलादेशातील हिंदूंना सतत त्रास देत आहे. मंदिरे पाडली जात आहेत, अत्याचाराच्या घटना, हिंदू भगिनी-मुलींवर बलात्कार, अपहरणाच्या घटना सातत्याने घडत आहेत. हिंदू समाजाची धार्मिक स्थळे, श्रद्धास्थाने पाडली जात आहेत. संत समाजाला तुरुंगात टाकण्याचे काम बांगलादेश सरकार करत आहे. इस्कॉनच्या संतांचा आणि हिंदू मंदिरांच्या पुजाऱ्यांचा छळ करून त्यांना तुरुंगात टाकण्याचे निंदनीय काम बांगलादेशच्या काळजीवाहू सरकारकडून सातत्याने केले जात आहे. बांगलादेशच्या काळजीवाहू सरकारची जिहादी मानसिकता दाखवते. बांगलादेशात हिंदू धर्म सातत्याने कमी होत आहे. आज बांगलादेशात केवळ ८% हिंदू समुदाय आहे जो बांगलादेशात केवळ त्यांच्या उपजीविकेसाठी असुरक्षित नाही तर आपल्या बहिणी आणि मुलींच्या जीवनाचे रक्षण करण्यासाठी भारताकडे पहात आहे. सध्याच्या परिस्थितीत बांगलादेशने हिंदूंवरील अत्याचार थांबवले नाहीत, तर कालपर्यंत मित्र राष्ट्र असलेला बांगलादेशही पाकिस्तानसारखा हिंदुविरोधी जिहादी मानसिकता असलेला म्हणून ओळखला जाईल. अशा स्थितीत भारत सरकारने



हा मुद्दा गंभीरपणे आंतरराष्ट्रीय पटलावर ठेवला पाहिजे आणि बांगलादेशच्या काळजीवाहुक सरकारला ताबडतोब हिंदू समाज आणि त्यांच्या धार्मिक श्रद्धा यांच्या रक्षणासाठी आवश्यक पावले उचलावीत, अन्यथा हिंदू समाज बांगलादेशविरोधात आवाज उठवेल. हिंदूंना जागृत करण्याचे आणि बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचाराच्या घटना जगासमोर पान २ वर

# रावसाहेब दानवे यांना मुख्यमंत्री करा

## मोदीं यांना कृष्णा गायके यांचे रक्ताने पत्र



**जालना । प्रतिनिधी -** माजी केंद्रीय रेल्वे, कोळसा व खनिज मंत्री रावसाहेब दानवे यांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री करावे अशी मागणी धनगर समाजाचे युवा नेते कृष्णा गंगाधर गायके यांनी केली आहे. तशा आशयाचे पत्र नरेंद्र मोदी यांना पाठविले आहे. महत्वाचे म्हणजे हे पत्र कृष्णा गायके यांनी स्वतःच्या रक्ताने लिहिले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, रावसाहेब दानवे हे महाराष्ट्रातील भाजपाचे ज्येष्ठ नेते आहेत. ते विद्यार्थीदशेपासून त जनसंघ तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रिय कार्यकर्ते राहिलेले आहेत. त्यांची तळागाळातील कार्यकर्त्यांशी व समाजातील सर्व घटकातील लोकांशी नाळ जुडलेली आहे. तसेच त्यांना पक्षांतर्गत व पक्षाबाहेरील विविध पदे भुषविलेली आहेत. रावसाहेब दानवे हे पाच वर्ष गावचे सरपंच राहिलेले आहेत. भोकरदन पंचायत समितीचे सभापती, विधानसभेवर आमदार म्हणून दहा वर्षे, खासदार म्हणून जालना लोकसभा मतदार संघातून गेली २५ वर्षे ते निवडून पान २ वर

# सिद्धेश्वर जाधवला शरद पवार इन्स्पायर फेलोशिप

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील विद्यार्थी शिक्षणाच्या जोरावर आपली कशी प्रगती साधु शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे, सिध्देश्वर जाधव, अगदी खेड्यातील काचनेरा येथील शेतकरी कुटुंबातील हा विद्यार्थी छोट्याशा खेडेगावातून टेंभुर्णी सारख्या शहरात येऊन श्रीमती.जे.बी.के.विद्यालयव नवभारत कनिष्ठ महाविद्यालयात शालेय शिक्षण पूर्ण करून, कृषी विषयक शिक्षण घेण्यासाठी न्हावा सिंदखेडराजा येथील कृषी महाविद्यालयात दाखल झाला, बि.एस्सी ग्रिकल्चर करणार्या सिद्धेश्वर जाधवला नुकतीच शरद पवार इन्स्पायर फेलोशिप प्राप्त झाली आहे. शेतीमधील विविध उपाय शोधणाऱ्या कृषी पदवीधरांना कृषी क्षेत्रात ठसा उमटवून काही अलौकिक कामगिरी करू बघणाऱ्या पदवीधरांना यशवंतराव चव्हाण सेंटर यांच्याकडून शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन ग्रिकल्चर देण्यात येते. २०२५ साठी. श्रीमती.जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयाचा माजी विद्यार्थी सिद्धेश्वर भानुदास जाधव याची या फेलोशिप साठी निवड जाहीर करण्यात आली आहे.



शेतकऱ्यांना शेती उत्पन्नात व रोजगार संधीत वाढ होण्यासाठी व कृषी क्षेत्रातील नव्या स्टार्टअपला बळकट करण्यासाठी ही फेलोशिप दिली जाते. या फ `लोशिपमुळे ग्रामीण भागातील सिध्देश्वर जाधव एक कृषी उद्योजक म्हणून नावारूपास येत आहे.

८ डिसेंबर २०२४ रोजी, मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर मध्ये त्याला फेलोशिप देण्यात येणार आहे. त्याच्या या यशस्वी शैक्षणिक कामगिरी बद्दल नवभारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष. संजय काबरा, उपाध्यक्ष जमिर शेख, सचिव सत्यनारायण सोनी, कोषाध्यक्ष सुभाष राठी, ज्येष्ठ संचालक रामनारायण काबरा, माजी अध्यक्ष सुरेशशेठ काबरा, पान २ वर

# शासन आपल्या दारी उपक्रमाला स्कॉच पुरस्कार


**नवी दिल्ली -** मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतील शासन आपल्या दारी या उपक्रमाला प्रतिष्ठीत स्कॉच पुरस्कार प्रदान करण्यात आला. देशभरातील विविध श्रेणीतील २८० प्रकल्पांमधून शासन आपल्या दारी च्या या महाराष्ट्राच्या मॉडेलची निवड करण्यात आली होती. शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या माणसापर्यत पोहोचवून त्याचे जीवन सुखकर करण्यासाठी हा उपक्रम मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाने वर्षभर यशस्वीरीत्या चालवून पाच कोटींहून अधिक लाभ नागरिकांच्या दारी पोहचविले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमासाठीचा पुरस्कार मुख्यमंत्री जनकल्याण कक्षाचे पान २ वर

# भारतीय कृषी संशोधन संस्थाच्यावतीने सोमवारी डॉ. प्रशांत तेलगड यांचा सन्मान

**जालना । प्रतिनिधी -** भारतीय कृषी संशोधन संस्था पुसा व कृषी जागरण यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय ग्लोबल फार्मर्स बिझनेस नेटवर्क व इंडियन कौन्सिल ऑफ आग्रिकल्चरल रिसर्च फेअर ग्राउंड पुसा नवी दिल्ली येथे हा सन्मान सोहळा होणार आहे.

भारतीय कृषी संशोधन परिषद (ICR) च्या सहकार्याने कृषी जागरण द्वारे आयोजित, MFOI पुरस्कार सेवा देतात. संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांच्या उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी राष्ट्रीय व्यासपीठ म्हणून. ICR सोबतची ही भागीदारी कार्यक्रमाचे महत्त्व वाढवते. कृषी नवकल्पना,



उत्कृष्टता आणि आपल्या देशाच्या शेतकऱ्यांच्या प्रगतीला पाठिंबा देण्यासाठी त्यांचे समर्पण दर्शवित हे राष्ट्रीय स्तरावर समिट २०२४ मध्ये मुख्य ध्येय आहे . यामध्ये शाश्वत शेती व सेंद्रिय शेतीवर आधारित उत्पादक उद्योगाच्या शक्यता आणि जागतिक स्तरावर भारताची भूमिका या विषयावर कामगिरी केल्याबद्दल जालना येथील आयोनेक्स्स केमिकल्स संचालक चे डॉ. प्रशांत तेलगड यांना सन्मानित करण्यात येणार आहे. येत्या २ डिसेंबर २०२४ रोजी खउठ दिल्ली व कृषी जागरण द्वारे आयोजित चऋजख सौहळा कार्यक्रमात डॉ. प्रशांत तेलगड यांना MFOI पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.


या कार्यक्रमात देशातील जगभरातील शास्त्रज्ञ,प्रगतीशील शेतकरी, जगभरातील लोकप्रतिनिधी, विविध कंपन्यांचे सीईओ उपस्थित राहणार आहेत. डॉ प्रशांत तेलगड यांचा राष्ट्रीयस्तरावर होत असलेल्या पान २ वर

# संपादकीय

पान

## द किंग इज बॅक...

रात्री नंतर सकाळ होतेच.... अंधारातून मार्ग काढला की प्रकाश दिसतोच मात्र हीच सकाळ आणि प्रकाश पाहण्यासाठी आपल्याकडे हवा तो संयम आणि स्वतः च्या क्षमतेवर असलेला विश्वास. जर स्वतःच्या क्षमतेवर विश्वास असेल आणि कितीही कठीण काळ आला तरी संयम सोडला नाही तर अपयशाची साखळी तोडून माणूस यशाची शिखरे गाठतोच. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे भारताचा माजी कर्णधार आणि धडाकेबाज फलंदाज विराट कोहली. गेली दीड वर्ष विराट कोहली हा अपयशाच्या गर्तेत सापडला होता. धावांची रास उभारणारी विराट कोहलीची बाब त्याच्यावर रुसली होती. शतकाचे इमले उभारणाऱ्या विराटला मागील दीड वर्षात कसोटीत एकही शतक झळकावता आले नाही त्यामुळे त्याच्यावर टीका होऊ लागली. काही महाभागांनी तर त्याला संघाच्या बाहेर ठेवण्याची मागणी केली. स्वतःला क्रिकेटचे तज्ज्ञ म्हणवून घेणारे देखील विराटवर टीका करू लागले. मीडियात देखील विराटवर हल्ला होऊ लागला. विराटचा हरवलेला फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय ठरला होता. विराट मात्र टिकाकरांकडे दुर्लक्ष करून आपल्या फलंदाजीवर लक्ष केंद्रित करत होता. टिकाकारांच्या टीकेला उत्तर देण्यात त्याने वेळ घालवला नाही तो नेहमी म्हणत असत की मला फक्त एका मोठ्या खेळीची गरज आहे. ती जर आली की मी पुन्हा फॉर्मात येईल कारण त्याचा स्वतःचा क्षमतेवर विश्वास होता. त्याला हवी असलेली मोठी खेळी ऑस्ट्रेलिया विरुद्धच्या पर्थ मधील पहिल्या कसोटीत आली. पर्थ कसोटीतील दुसऱ्या डावात विराटने धडाकेबाज नाबाद शतक झळकावले आणि भारताला जुना विराट सापडला. विराट पुन्हा फॉर्मात आला. द किंग इज बॅक.... असाच इशारा त्याने या खेळीने जगाला दिला. टी २० विश्वचषकातही त्याला म्हणावा तसा फॉर्म सापडला नव्हता मात्र दक्षिण आफ्रिके विरुद्ध महत्वाच्या अंतिम सामन्यात त्याने अविश्वसनीय अर्धशतकी खेळी करून भारताला विश्वविजय मिळवून दिला मात्र पुन्हा त्याचा फॉर्म हरपला नुकत्याच झालेल्या बांगलादेश व न्युझीलंड विरुद्धच्या कसोटी साम न्यांच्या मालिकेत त्याला धावा काढता आल्या नाहीत मात्र ऑस्ट्रेलिया विरुद्ध त्याने आपल्या शतकी तडाखेबंद खेळीने भारताला एकहाती विजय मिळवून देताना अनेक विक्रमांना गवसणी घातली. या शतका बरोबरच त्याने अनेक विक्रमांना गवसणी घातली. हे त्याचे कसोटीतील ३० वे शतक आहे. हे त्याचे ऑस्ट्रेलियातील सातवे शतक आहे. ऑस्ट्रेलियात सर्वाधिक कसोटी शतक झळकावणारा भारतीय असा विक्रम आता त्याच्या नावावर जमा झाला आहे. पूर्वी हा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावे होता त्याने ऑस्ट्रेलियात सहा कसोटी शतके झळकावली आहेत. विराट कोहलीच्या नावावर आता एकूण ८१ शतक आहेत. कसोटीत ३०, एकदिवसीय सामन्यात ५० तसेच टी २० साम न्यात १ असे एकूण ८१ शतके त्याच्या नावावर जमा झाली आहेत. ८० पेक्षा अधिक शतके झळकावण्याचा पराक्रम करणारा सचिन नंतरचा तो दुसराच खेळाडू आहे. सध्या खेळत असणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. सध्याची कामगिरी पाहता तो लवकरच विक्रमविर सचिन तेंडुलकर यांचा १०० शतकांचा विक्रम लवकरच मोडेल यात शंका नाही. मागील दीड वर्षाचे अपयश मागे टाकून तो पुन्हा आपल्या जुन्या अवतारात परतला आहे हे भारतासाठी शुभचिन्ह आहे. विराट पुन्हा फॉर्मात आल्याने या वर्षी तो धावांचा रतीब घालणार यात शंका नाही. यावर्षी भारत अनेक मोठ्या स्पर्धेत सहभागी होणार आहे. या मोठ्या स्पर्धेत विराटचा फॉर्म भारताला विजय मिळवून देईन. यावर्षी एकदिवसीय सामन्यांची चॅम्पियन ट्रॉफी तसेच विश्व कसोटी अजिंक्यपद देखील आहे. जर विराटचा हा फॉर्म असाच राहिला आणि त्याला संघातील इतर खेळाडूंनी साथ दिली तर यावेळी भारत या दोन्ही महत्वाच्या स्पर्धे त अजिंक्यपद मिळवेल यात शंका नाही. विराट अजूनही तरुण आहे त्याचा फॉर्म परत आला आहे आणि त्याच्या फिटनेसवर तर शंकाच नाही संघातील सर्वाधिक फिट खेळाडू हा विराटच आहे त्यामुळे तो आणखी तीन चार वर्ष सहज खेळू शकतो या दरम्यान तो सचिनचा १०० शतकांचा विक्रम सहज मोडू शकतो. सचिनचा विक्रम जर कोणी म ोडू शकेल तर तो फक्त विराटच आहे कारण आज त्याच्या नावे ८१ शतकांची नोंद आहे. सध्या खेळणारा कोणताही खेळाडू त्याच्या आसपासही नाही. त्यामुळे सचिनचा विराट विक्रम विराट कोहलीच मोडेल यात शंका नाही



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# इफ्फी येथे राज कपूर यांची शताब्दी रणबीर कपूरच्या उपस्थिती साजरी

प्रख्यात अभिनेते आणि दिग्दर्शक राज कपूर यांच्या शताब्दी समारंभाचा एक भाग म्हणून, ५५ व्या भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (इफ्फी) राज कपूर यांचे नातू रणबीर कपूर आणि ज्येष्ठ चित्रपट निर्माते राहुल रवैल यांनी एका विशेष सत्रात उपस्थित राहून या कलाश्रेष्ठाला आदरांजली वाहिली. हे सत्र म्हणजे राज कपूर यांचे भारतीय चित्रपटसृष्टीतील अतुलनीय योगदान, त्यांचा चिरस्थायी प्रभाव आणि त्यांच्या कलाकृतींचा उच्च वारसा यांचा आकर्षक धांडोळा होता. रणबीर कपूर यांनी त्यांच्या आजोबांचा विलक्षण प्रभाव विशद करून राज कपूर यांचे चित्रपट काळ आणि सीमा ओलांडतात, हे अधोरेखित केले. आवारा, मेरा नाम जोकर आणि श्री ४२० यांसारख्या चित्रपटांची सार्वत्रिक मोहिनी कशी होती, ते रशियापासून भारतापर्यंत जगभरातील प्रेक्षकांमध्ये खोलवर कसे रुजले यावर त्यांनी स्पष्ट केले. राज कपूर यांच्या चित्रपटांच्या प्रासंगिकतेवर प्रकाश टाकत, रणबीर यांनी आवाराच्या संकल्पनेने जातीवादाचा कसा वेध घेतला, हे नमूद केले तर श्री ४२० हा लोभ आणि महत्त्वाकांक्षेचे विषय हाताळण्यात मध्ये गुंतला होता, प्रेमरोग आणि राम तेरी गंगा मैली यांसारख्या नंतरच्या चित्रपटांची स्त्रियांच्या समस्या आणि सामाजिक आव्हानांवरील नैतिक कथनांसाठी प्रशंसा करण्यात आली, ज्यामुळे काळाच्या पुढे असलेला चित्रपट निर्माता म्हणून राज कपूर यांचा दृष्टिकोन अधोरेखित केला गेला. राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ (एनएफडीसी), भारतीय राष्ट्रीय चित्रपट अर्काईव्हज (एनएफएआय) आणि फिल्म हेरिटेज फौंडेशन या संस्थांच्या सहकार्याने राज कपूर यांच्या चित्रपटांचे पुनर्संचयन करण्याच्या प्रयत्नांची देखील रणबीर कपूर यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की राज कपूर यांचे दहा चित्रपट याआधीच पुनर्संचयित केलेले असून डिसेंबर २०२४ मध्ये भारतभरात ते प्रदर्शित करण्याचे नियोजन सुरु आहे. भारतीय चित्रपटसृष्टीची पायाभरणी करण्यात राज कपूर यांनी दिलेल्या योगदानाचा सन्मान करत, राज कपूर यांची चित्रपटीय प्रतिभा जतन करण्याच्या तसेच त्याचा उत्सव साजरा करण्याच्या महत्त्वावर रणबीर कपूर यांनी अधिक भर दिला. या सत्राम ध्ये चित्रपट निर्मिती, अभिनय आणि सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यात चित्रपटांची विकसित होत गेलेली भूमिका यासंदर्भातील चर्चेचा देखील समावेश होता.पिता झाल्यानंतर पर्यावरण आणि सामाजिक बदलांप्रती आपण अधिक जागरूक झालो असे सांगताना रणबीर कपूर यांनी कलाकारांना त्यांचे मंच जागतिक कल्याणासंदर्भात ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी आणि त्याचे समर्थन करण्यासाठी वापरावेत असे आवाहन केले. जगभरातील महान कलाकारांकडून प्रेरणा घेऊन स्वतःची वेगळी अशी शैली विकसित करण्यासाठी नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देऊन रणबीर यांनी अभिनयात स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असण्याचे महत्त्व अधोरेखित केले.सत्राच्या शेवटी, रणबीर कपूर यांनी हा आदरांजलीपर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल इफ्फीप्रती कृतज्ञता व्यक्त केली आणि उपस्थित प्रेक्षकांना राज कपूर यांच्या चिरंतन कार्याचा आनंद घेऊन त्याचे हृदयात जतन करण्याचे आवाहन केले. रणबीर याने व्यक्त केलेल्या विचारांना दुजोरा देत राहुल रवैल यांनी चित्रपट सृष्टीवरील तसेच सम ाजावरील राज कपूर यांच्या कायमस्वरूपी प्रभावाचा उल्लेख केला.




या सत्रात केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभाग सचिव संजय जाजू, सुप्रसिध्द भारतीय चित्रपट निर्माते आणि इफ्फीचे महोत्सव संचालक शेखर कपूर, केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभागाचे संयुक्त सचिव आणि एनएफडीसीचे व्यवस्थापकीय संचालक प्रीथूल कुमार आणि केंद्रीय माहिती आणि प्रसारण विभागातील चित्रपट विभागाच्या संयुक्त सचिववृंदा देसाई यांनी भाग घेतला.

# ६वीं साकिब रिज़वी मेमोरियल कैंसर अवेरनेस मॅरेथॉन

## पर्यावरणीय शाश्वतता आणि महिलांच्या सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा उपक्रम

सहावी साकिब रिज़वी मेमोरियल कैंसर अवेरनेस मॅरेथॉन कार्यक्रम ाची तारीख रोजी आयोजित केली जाईल, ज्यामध्ये हजारो स्पर्धक, समर्थक आणि सामाजिक बदल घडवून आणणारे व्यक्तिम त्व सहभागी होतील. यावर्षीचा मॅरेथॉन आरोग्य, पर्यावरणीय शाश्वतता आणि महिलांच्या सुरक्षिततेसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत करणार आहे, ज्याचा उद्देश समाजामध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे आहे. मॅरेथॉनची मुख्य वैशिष्ट्यया मॅरेथॉनम ध्ये विविध गटांतील धावपटू सहभागी होतील, ज्यामध्ये अनुभवी ऍथलिट्सपासून नवशिके उत्साही लोकांपर्यंत सर्वजण असतील. यावर्षीचा विषय गो ग्रीन, प्लास्टिक-फ्री असून तो पर्यावरण संरक्षणासाठी जागरूकता निर्माण करण्यावर भर देतो. याशिवाय, या कार्यक्रमात महिलांच्या सुरक्षितते आणि सशक्तीकरणावर विशेष भर दिला जाणार आहे. मॅरेथॉनदरम्यान जनजागृती मोहिमा चालवल्या जातील, ज्या या महत्त्वाच्या विषयावर माहिती देतील. अधिकृत मॅरेथॉन ॲप आणि आपत्कालीन कार्डची सुरुवात

यावर्षीचा एक विशेष आकर्षण म्हणजे रूमी केयर ऐप चा शुभारंभ, जो सहभागींना अधिक चांगला अनुभव प्रदान करेल आणि त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देईल. या ॲपच्या वैशिष्ट्यांमध्ये समाविष्ट आहे. रिअल-टाइम रेस ट्रॅकिंग: धावपटू आणि प्रेक्षकांसाठी. आपत्कालीन कार्डची सोय: कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत आयोजक आणि आपत्कालीन सेवा प्रदात्यांना तत्काळ सतर्क करण्याचा पर्याय. शाश्वत विकासाचे निरीक्षण: प्लास्टिक-म ुक्त योगदान आणि पर्यावरणस्नेही उपक्रमांचे परीक्षण. त्वरित कार्यक्रम अद्यतने: कार्यक्रमातील बदल आणि आवश्यक सूचना त्वरित मिळवा. ॲड (श्रीमती) रूबीना अख्तर हसन रिज़वी: हा ॲप सामूहिक उपक्रमांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे. तो केवळ सहभागींना अधिक चांगला अनुभव देतोच, परंतु सुरक्षा आणि शाश्वततेबाबत आमची वचनबद्धता मजबूत करतो.

कार्यक्रम वेळापत्रक तारीख: रविवार, १ दिसंबर २०२४ वेळ: नोंदणी सकाळी ०४.३० च्, आणि फ्लॅग-ऑफ ०५.३० ला. स्थान: एमएमआरडीए, जी८ ग्राउंड, बीकेसी, मुंबई

यावर्षी ६ वी साकिब रिजवी कॅन्सर मेमोरियल मॅरेथॉन मध्ये प्रतिष्ठित व्यक्तींची उपस्थिती या उपक्रमाला प्रेरणादायी बनवणार आहे. अभिनेता अरबाज खान, कार्यक्रमाचा चेहरा, जे आशा आणि जनजागृतीचा संदेश देतील प्रसिद्ध ऑलिम्पिक ॲथलिट अक्षय खोत, कार्यक्रमाचे ब्रँड ॲम्बेसेडर, जे सामर्थ्य आणि प्रेरणेचे प्रतीक आहेत। राजकीय मान्यवर आणि विविध देशांचे कौन्सुल जनरल, जे कॅन्सर विरोधातील लढाईसाठी आणि पर्यावरणीय शाश्वततेसाठी जागतिक एकता दाखवतील इन्फ्लुएंसर्स, वैद्यकीय तज्ञ, डॉक्टर्स, आणि कॅन्सर वाचलेले योद्धे, जे समाजाला दृढता आणि आशेचा संदेश देतील हा कार्यक्रम यूट्यूबवर लाईव्ह स्ट्रीम केला जाणार आहे, ज्यामुळे जगभरातील लोक वर्चुअल सहभागी होऊ शकतील आणि या महत्त्वपूर्ण उपक्रमाला पाठिंबा देतील. कार्यक्रमाची सुरुवात उत्साहवर्धक वॉर्म-अप सत्राने होईल, त्यानंतर विशेष अतिथीचे यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ समारंभ होईल. दिवसभरात



सहभागींसाठी थेट परफॉर्मन्स, जनजागृती मोहिमा आणि भव्य पुरस्कार वितरण समारंभासह अनेक कार्यक्रम होणार आहेत.

६ वी साकिब रिजवी कॅन्सर मेमोरियल मॅरेथॉन मध्ये सर्वांना सहभागी होण्यासाठी आणि या महत्त्वाच्या मुद्द्यांना पाठिंबा देण्यासाठी आमंत्रित केले जाते. धावणे, स्वयंसेवक म्हणून काम करणे किंवा प्रेक्षक म्हणून उपस्थित राहणे, प्रत्येक व्यक्तीचे योगदान महत्त्वाचे आहे. सर्व सहभागींस विनंती आहे की, त्यांनी रूमी केयर ऐप डाउनलोड करून आपले आपत्कालीन कार्ड सक्रिय करावे.

साकिब रिजवी कॅन्सर मेमोरियल मॅरेथॉन हा कॅन्सर जनजागृती, पर्यावरणीय शाश्वतता आणि सामाजिक न्यायासाठी एक प्रमुख उपक्रम आहे. सहाव्या वर्षात पदार्पण करत असताना, हा मॅरेथॉन समाजाला एकत्र आणण्याचा आणि आरोग्यदायी, समतावादी भविष्यासाठी प्रेरित करण्याचा प्रयत्न करत आहे.

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक - डॉ नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचा आज स्मृतिदिन. दोन वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते.

मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक म हत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड, ९९२२५४६२९५**

पान १ वरुन

## बांगलादेशाची हिंदुविरोधी ...

मांडण्याचे काम करेल, याचे अनेक पुरावे सोशल मीडियावर उपलब्ध आहेत. आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद, राष्ट्रीय बजरंग दलाची मागणी आहे की बांगलादेशात राहणाऱ्या हिंदूंची कुटुंबे, त्यांची मालमत्ता आणि धार्मिक स्थळांना सुरक्षा पुरवावी आणि बांगलादेशातील हिंदूंच्या नष्ट झालेल्या धार्मिक स्थळांच्या संरक्षणासाठी पावले उचलावीत. हिंदूंच्या ज्या मालमत्तेची नासधूस झाली आहे, त्याची आर्थिक भरपाई हिंदूंना त्वरित देण्यात यावी. बांगलादेशातील हिंदूंवर अशाच प्रकारे अत्याचार होत असतील, तर येत्या काळात बांगलादेशातील हिंदू सम ाजासाठी प्रत्येक स्तरावर लढण्याची तयारी करण्यासाठी भारतातील संपूर्ण हिंदू समाज समाजाला जागृत करण्याचे काम करेल, अशी मागणीही आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेने केली आहे. बांगलादेशातील भारत सरकारने हिंदूंवरील अत्याचार थांबेपर्यंत त्यांच्याशी होणारे सर्व आर्थिक, व्यावसायिक आणि इतर प्रकारचे व्यवहार थांबवावेत. बांगलादेशने घुसखोरांना अटक करून देशातून हद्दपार करावे असे निवेदनात म्हणले आहे

या निवेदनावर अविनाश देशमाने राजू केवट योगेश भारद्वाल वैभव कुलकर्णी संतोष देशमुख भरत बोराडे दत्ता भागवत संदीप भवर विनोद फदटा लहू गवळी निलेश दहिटकर निलेश कटक रुपेश कायस्थ व आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद व राष्ट्रीय बजरंग दल यांच्या पदाधिकारी यांच्या स्वाक्षरी आहेत.

## सिद्धेश्वर जाधव ...

ज्येष्ठ संचालक तथा माजी सचिव प्रेमसुख काबरा, संचालक तथा माजी सचिव प्रल्हाद टेंभुर्णीकर, संचालक राजीव काबरा, संचालक दीपक काबरा,संचालक मधुकरराव निकम संचालक. विश्वनाथ सांगुळे, संचालक तथा उपप्राचार्य प्रा.दत्ताजीराव देशमुख, संचालक प्रदीप मुळे, संचालक प्रदीप काबरा, प्राचार्य.नंदकुमार काळे, उपमुख्याध्यापक. पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक. धनंजय पुराणे, एस.बी.बोरकर, विष्णू जाधव, रमेश इंगळे, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक अरुण आहेर, प्राध्यापक रामदास भांगे, प्राध्यापक केजी जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, प्राध्यापक डॉक्टर आनंद जाधव, भिवसन ससाने, कैलास भुतेकर, राजेश शेवाळे राजेंद्र जगताप, दिनकर उखर्डे, दत्ता उखर्डे, रवींद्र मोरे,, संजय कुलकर्णी, आवटी मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम, भिलावेकर मॅडम, शेख मॅडम, लंबे मॅडम, राजु डोमळे,नागोराव देशमुख, दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख , सर्व प्राध्यापक, गावकरी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व विद्यार्थी वतीने त्याला हार्दिक शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात आले.

## रावसाहेब दानवे ...

आलेले आहेत. महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष असतांना त्यांच्या अधिपत्याखाली भाजपाने घवघवीत यश मिळविले आहे. केंद्रात ते ग्राहक संरक्षण मंत्री, रेल्वे, कोळसा खनीज राज्यमंत्री म्हणून त्यांनी उत्तम काम केले आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा २०२४ चे स्टार प्रचारक होते. ते पक्ष, जनता व सरकारशी एकनिष्ठ आहेत. त्यांच्या ज्ञानाचा, कार्याचा अनुभवाचा व आजपर्यंतच्या दिलेल्या सेवेचा लाभ महाराष्ट्राला व्हावा म्हणून रावसाहेब दानवे यांना महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री करावे अशी मागणी अखिल भारतीय धनगर समाजाच्यावतीने होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. हे पत्र कृष्णा गायके यांनी स्वतःच्या रक्ताने लिहिले आहे.

## शासन आपल्या दारी ...

प्रमुख डॉ. अमोल शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. याप्रसंगी 'स्कॉच ग्रुप' चे अध्यक्ष समीर कोचर, उपाध्यक्ष डॉ गुरुशरण धंजल, व्यवस्थापकीय संचालक दीपक दलाल उपस्थित होते. शासन आपल्या दारीने सार्वजनिक सेवा वितरणातील उदाहरण निर्माण केले आहे. आता शासन आपल्या दारी २.० हे लक्ष्य असेल अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे स्कॉच अवार्ड मिळाल्यावर व्यक्त केली आहे. नागरिकांना शासनाचे विविध लाभ कुठल्याही अडथळ्याविना, सुलभरीत्या त्यांच्यापर्यंत मिळावेत म्हणून सुरु करण्यात आलेला हा उपक्रम यापुढेही असाच प्रयत्नपूर्वक राबविण्यात येईल. विविध शासकीय योजनांचे लाभ कोणत्याही अडथळ्याविना सर्वसामान्य नागरिकांना मिळावेत, त्यासाठी त्याना वारंवार सरकारी कार्यालयात चक्कर मारावी लागू नये, त्यासाठी नागरिकांच्या वेळेचा अपव्यय होऊ नये यासाठी 'शासन आपल्या दारी' हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. आज या उपक्रमाला मानाचा स्कॉच पुरस्कार मिळणे ही निश्चितच आनंदाची आणि अभिमानाची बाब असून याद्वारे सार्वजनिक सेवांच्या यशस्वी वितरणाचे एक आदर्श उदाहरण देशासमोर आले आहे याचा सार्थ आनंद आणि अभिमान वाटत असल्याचे मत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले.

गतवर्षी १५ मे रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण येथून या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला होता. महाराष्ट्राच्या या उपक्रमाने स्कॉच अवार्ड च्या नागरिक-केंद्रित प्रशासन या श्रेणीत ८० हून अधिक उपक्रमांना मागे टाकत अंतिम फेरी गाठून पुरस्कारही पटकाविला. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी शासन आपल्या दारी च्या प्रत्येक उपक्रमाला व्यक्तिशः हजेरी लावली होती. खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी देखील हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी वेळोवेळी म ार्गदर्शन केले आहे. शासन आपल्या दारी चे हे यश आहे. आता आम्ही शासन आपल्या दारी २.० राबविण्यासाठी सज्ज आहोत. हा उपक्रम संयुक्त राष्ट्राच्या शाश्वत विकास उद्दिष्ट्यांशी संलग्न आहे. यामुळे प्रशासनामध्ये सुलभ, जलद सेवेचे उत्तरदायीत्व निर्माण होणार आहे. हे या उपक्रमाचे फलित असल्याची प्रतिक्रिया डॉ अमोल शिंदे यांनी दिली. त्यांनी या उपक्रमाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिलेल्या पाठबळासाठी आभार मानले आहेत. राज्य प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचारी यांनीही प्रत्यक्ष सहभाग घेऊन ते यशस्वी होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या सर्वांच्या अथक प्रयत्नांच्या बळावरच 'शासन आपल्या दारी'ला मनाचा 'स्कॉच पुरस्कार' मिळाला असून हा पुरस्कार या सर्वांच्या प्रयत्नांचे फळ असल्याचे मत मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव डॉ. अमोल शिंदे यांनी हा पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केले.

## भारतीय कृषि ...

सन्मानाबद्दल प्रा.डॉ रामदास निहाळ, डॉ राहुल वाहटूळे, प्रा डॉ प्रताप रामपुरे, प्रा डॉ दिलीप सपाटे, प्रा वडजे , निवृत्ती मावस्कर, सर्जेराव थोरात, सुरेश गोरे, संतोष भुतेकर आदींनी अभिनंदन केले आहे.

# सुवर्ण महोत्सवी वर्षातील सह्याद्री विद्यामंदिरचा क्रीडा महोत्सव साजरा



**भांडुप । प्रतिनिधी -** सह्याद्री विद्यामंदिर, भांडुप पश्चिम येथील सह्याद्री विद्यामंदिरचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या सुवर्ण महोत्सवी वर्षात पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाचा शालेय वार्षिक क्रीडा महोत्सव सोमवार दिनांक २५ नोव्हेंबर ते २८ नोव्हेंबर पर्यंत दिमाखात पार पडला. क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ सह्याद्री विद्या प्रसारक संस्थेचे सचिव सन्माननीय श्री जगन्नाथ अंबरे साहेब यांच्या हस्ते झाला. नर्सरी ते इ.चौथीच्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धांचे आयोजन केले होते. या सर्व स्पर्धांमध्ये शाळेच्या प्रत्येक विद्यार्थ्याने सहभाग घेतला. यावर्षीचे वैशिष्ट्य म्हणजे २८ नोव्हेंबर रोजी विद्यार्थ्यांच्या स्पर्धा पूर्ण झाल्यावर खास पालकांसाठी बादलीत चेंडू टाकणे या स्पर्धेचे आयोजन केले होते. प्राथमिक विभाग ६२ पालकांनी व पूर्व प्राथमिक विभागातील ३५ पालकांनी सहभाग घेतला. विजेत्या व सहभागी पालकांचे अभिनंदन संस्थेचे सहसचिव रमेश राणे व खजिनदार प्रदीप वारणकर, मुख्या. श्रीम. चिंदरकर यांनी केले.



**जालना शहरात गेल्या आठवडाभरापासून थंडीत वाढ झाली आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी घराजवळ व चौकात अशा शेकोट्या पेटवून नागरिक ऊब घेत आहेत. (छाया मजहर सौदागर)**

# पराभवाने खचून न जाता शेतकरी, कष्टकरी व सामान्यांच्या प्रश्नावर संघर्ष करून त्यांना न्याय मिळवून द्या - भास्कर अंबेकर



**जालना । प्रतिनिधी -** लोकसभेत सामान्यांनी मतदान केले परंतु लोकसभेच्या प्रभावानंतर विरोधक सावध झाले व निवडणुकीच्या तोंडावर अनेक लाभाच्या घोषणा करून त्यांनी सामान्य मतदारांना प्रलोभन दिले. निवडणुकीपुरत्या योजनांच्या अटी शिथिल करून जास्तीत जास्त लाभार्थी केले व नंतर शिथिल अटी येथील पुन्हा लागू करून सामान्यांची फसवणूक केली, असे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर जिल्हा कार्यकारिणीच्या बैठकीत बोलताना म्हणाले.

यावेळी व्यासपीठावर जिल्हा संघटक भानूदास घुगे, उपजिल्हाप्रमुख भगवानराव कदम, रमेश गव्हाड, मुरलीधर शेजुळ, बाबुराव पवार, मनिष श्रीवास्तव, परमेश्वर जगताप, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष उत्तमराव वानखेडे, जि. प. सदस्य कैलास पुंगळे, कैलास चव्हाण, किसन सेनेचे जिल्हा संघटक मुरलीधर थेटे, युवा सेनेचे जिल्हा युवाधिकारी शिवाजी शेजुळ, महिला आघाडीच्या जिल्हासंघटक मंगल मेटकर, तालुकाप्रमुख हरीहर शिंदे, जयप्रकाश चव्हाण, कैलास पुंगळे, नवनाथ दौड, कुंडलिक मुठ्ठे,अंकुश शिंदे, शहर प्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोटीवाले आदी उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुका व आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या पार्श्वभूमीवर आज जालना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जालना शहरातील शिवसेना भवन येथे प्रमुख पदाधिकार्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी पदाधिकार्यांना मार्गदर्शन करताना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर बोलताना पुढे म्हणाले की,सत्ता, शासकीय यंत्रणा व प्रचंड पैसा यांचा वापर करून विधानसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवारांनी यश मिळविले. परंतु महाविकास आघाडीलाही कोट्यावधी मतदारांनी मतदान केले. जालना जिल्ह्याचाच विचार केला तर आपल्या महायुतीला ५ लाख ३८ हजार तर आपल्या महाविकास आघाडीला ४ लाख ३१ हजार एवढे मतदान झाले. त्यात लाखापेक्षा कमी मताधिक्य राहिले. जालना व परतुर मतदार संघामध्ये महाविकास आघाडीत काँग्रेसच्या बंडखोरीमुळे

मतदान कमी झाले. त्याचबरोबर अनेक अपक्ष उमेदवार उभे करण्यात आले. त्यांनीही महाविकास आघाडीचेच मतदान घेतले. या बंडखोर्या झाल्या नसत्या तर महाविकास आघाडीच्याच जागा आल्या असत्या. घनसावंगी व परतुर या मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार हे दोन ते चार हजार मतांच्या फरकाने पराभूत झाले. ज्या लाखो मतदारांनी आपल्याला मतदान केले त्यांना आपण वार्यावर सोडणार का? म्हणून आता ज्यांनी मतदान केले व ज्यांनी केले नाही अशा सर्वांच्या प्रश्नांसाठी पूर्वीच्याच ताकदीने संघर्ष करा. त्यांना न्याय मिळवून द्या. असे झाल्यास येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत हेच मतदार पुन्हा तुमच्या बाजूने उभे राहतील.

यावेळी माजी आमदार संतोष सांबरे, भानुदास घुगे, बाबुराव पवार, यांनीही उपस्थित त्यांना मार्गदर्शन केले. तसेच सगळ्यांच्या भावना जाणून घेतल्या गेल्या. या बैठकीस पंचायत समिती सदस्य किसन खांडेकर, रवी बोचरे, भरत मदन, अरुण डोळसे, अण्णासाहेब बाळराज, डॉक्टर राजेश राऊत, माजी नगरसेवक संदीप नाईकवाडे, विजय पवार, जे.के.चव्हाण, गंगुताई वानखेडे, उपतालुकाप्रमुख प्रभाकर उगले, बाबुराव कायंदे, विभागप्रमुख प्रभाकर घडलिंग, पंडित क्षीरसागर, जनार्दन गिराम, मंजुषा घायाळ, बळीराम ढवळे, ज्ञानेश्वर गोरे, केशव क्षीरसागर, अनिल अंभोरे चेतन भुरेवाल,सखावत पठाण, तुळशीदास काळे, दिलीप डोंगरे परमेश्वर डोंगरे, दिलीप गिराम, सुदर्शन चौधरी, हरी शेळके, रमेश वाघ, विष्णुपंत गिराम, राजू परदेशी, राजू जाधव, संजय रत्नपारखे, अंकुश राजेजाधव, विष्णुपंत गिराम, शंकर जाधव संदीप मगर रामजी गायकवाड, जीवन खंडागळे वैजनाथ शिरसाट, महादेव कावळे, सुरेश वाघमारे, एनडी कडोस, रामेश्वर कुरील, नरेश कपूर, सोनाजी खांडेभराड, आदी पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर येथे नवरस वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**परतूर । प्रतिनिधी** - विवेकानंद इंग्लिश स्कूल व विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर येथे नवरस या संकल्पनेवर आधारित वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासोबतच विविध कला गुण विकसित होण्यासाठी दरवर्षी वेगवेगळ्या संकल्पना वर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. या वर्षी हास्य, क्रोध, करुणा, रौद्र, बिभत्स, भय, शृंगार, वीर, आणि अद्भुत आदी भाव प्रकट करणारे नृत्य व नाटीकांचे सादरीकरण करण्यात आले. या प्रसंगी पालक वर्ग व प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद देउन विद्यार्थ्यांचे कौतूक केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण हे रामायण नाटीका होते. विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन रामाचा वनवास, सिताहरण, राम सेतू आणि राम व रावण युद्ध हे देखावे सादर करून उत्कृष्ट कलेचा अविष्कार प्रेक्षकांसमोर मांडला.

या प्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटन विवेकानंद सेवा केंद्र, परतुर चे अध्यक्ष डॉ. एस. जी. बाहेकर व प्रमुख पाहुणे रश्री,संदीप बाहेकर,प्रा,भालचंद्र महाजन,अतुलजी पोरवाल, आबासाहेब वरखडे, कुंडलीकराव जाधव, जगन्नाथराव सोनखेडकर, डॉ. शिकारे, शिवाजीराव पोकळे, मोहनराव आढे, रिंढे सर, भगवानराव नागरे, मुजाहिद कायमखानी, श्रीमती. संगीता शिंदे व श्रीमती. रोडगे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा विभागीय व राज्य स्तरावर क्रिडा स्पर्धांमध्ये विजयी संघ व खेळाडूंचे सत्कार सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज पांडे व श्रीमती. मेधा पाथरकर-आकात यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विष्णू बाहेकर, सुंदर राठोड, व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन विजयकुमार दंदाले यांनी केले.

# जालन्यात सोशल डेमोक्रॅटिक पार्टीचे एकदिवसीय धरणे आंदोलन

## उत्तर प्रदेशातील संभल येथील घटनेचा निषेध





**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया या संघटनेच्या वतीने एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आलंय. उत्तर प्रदेशातील संभल येथील जामा मशिदीचे सर्वेक्षण असंवैधानिक आहे. यासंदर्भात निदर्शने करताना पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एका युवकाचा मृत्यू झाला होता. याविरोधात सोशल डेमोक्रेटिक पार्टीच्या वतीने जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून निदर्शने करण्यात आलीय. यावेळी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केलाय. उत्तर प्रदेशातील संभल येथे घडलेल्या घटनेतील दोषींवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याची मागणी सोशल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाच्या पदाधिकाऱ्यांनी केलीय.

दरम्यान या आंदोलनानंतर सोशल डेमोक्रॅटिक पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राष्ट्रपतीना निवेदन पाठवण्यात आलं आहे.

यावेळी असादुल्लाह रजवी, एडवोकेट खुर्रम, विजय कामळे, इरफान खान, हुज़ेफ खान, शफी बागवा, सय्यद कलिम, वसीम शेख, समीर शेख, शोकत बगवान, इमरान मिर्झा, अरबाज खान हनीफ इनामदार, अब्दुल रहीम, जुबेर शहा सह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# टेंभुर्णीमध्ये टिपू सुलतान जयंती साजरी



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शेर ए म्हैसूर टिपू सुलतान यांची जयंती येथे मंगळवारी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. उत्सव समितीतर्फे आयोजित या कार्यक्रमात संपूर्ण गावातून टिपू सुलतान यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. मिरवणुकीचा शुभारंभ उत्सव समितीचे अध्यक्ष अयुब कुरेशी यांच्या हस्ते रेबीन कापून करण्यात आला. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून सुरू झालेली ही मिरवणूक मुख्य सडकेवरून टिपू सुलतान चौक, मेन रोड, चमन या मार्गे वेशीबाहेर जाऊन विसर्जित झाली. यावेळी बोचऱ्या थंडीतही डीजेच्या तालावर तरुणाई थिरकली. मिरवणुकीत टेंभुर्णीसह परिसरातील अनेक गावातून आलेल्या तरुणांनी रेकॉर्ड ब्रेक गर्दी केली होती. यावेळी टिपू की तलवार है... ये टिपू की तलवार है.... या गीतावर तरुणांनी विशेष ठेका धरला होता. मिरवणुकी दरम्यान एपीआय सचिन खामगळ, पीएसआय रवी देशमाने यांनी आपल्या पोलीस पथकासह चोख बंदोबस्त ठेवला होता. या मिरवणुकीसाठी टिपू सुलतान उत्सव समितीचे अध्यक्ष अयुब कुरेशी, उपाध्यक्ष शेख इरफान, अद्दू चाऊस, शेख असलम, वसीम कुरेशी, शेख जाकेर, इकबाल कुरेशी, इमरान पठाण, शेख मुजाहिद बिल्डर, रफिक पठाण, हसन चाऊस आदींसह समितीच्या पदाधिकाऱ्यांनी पुढाकार घेतला.

### उमलत्या वयाशी जुळवून घेताना; दोन दिवसीय कार्यशाळा

# स्वत:चे व्यक्तिमत्व चांगले करणे गरजेचे- विशाखा वेलणकर

**जालना । प्रतिनिधी -** संस्कार प्रबोधिनी विद्यालय व ज्ञान प्रबोधिनी स्त्री शक्ती प्रबोधन संवादिनी गट पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ' उमलत्या वयाशी जुळवून घेताना ' यात विशाखा वेलणकर बोलताना म्हणाल्या की, प्रत्येकाने स्वतःचे व्यक्तिमत्व चांगले करण्यासाठी सतत कार्यरत असले पाहिजे. असे प्रतिपादन दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत त्यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी, विनायकराव देशपांडे,प्रा. केशरसिंह बगेरिया, डॉ.वैशाली पंडित, ज्ञान प्रबोधिनीच्या हेमांगी ठाकूर, मानसी ओगले, अमिता बेहेरे, परिमला पांडे, समृद्धी देशमुख आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाच्या उद्घाटक डॉ. वैशाली पंडित बोलताना म्हणाल्या किशोरवयीन अवस्थेत शरीरात प्रचंड बदल होत असतात. काय करावे काय करू नये हे आपल्याला माहीत असले पाहिजे. आपली दैनंदिनी ठरवून कार्य केल्यास शरीर तंदुरुस्त राहते.या वयात विद्यार्थ्यांमध्ये चिडचिडेपणा होणे.यासाठी आहारचे समतोल आपल्याला राग आला पाहिजे.यासाठी संस्कार प्रबोधिनीने उमलत्या वयाशी जुळून घेताना या कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.



या कार्यक्रमास इयत्ता नववी दहावी मधील विद्यार्थी तसेच मुख्याध्यापक ईश्वर वाघ, रामदास कुलकर्णी, रेखा हिवाळे, शारदा उगले दहिभाते, कीर्ती कागबट्टे, स्वप्नजा खोत, सुप्रिया कुलकर्णी, माणिक राठोड, रशीद तडवी, राहुल घोलप यांच्या सह शिक्षकेतर कर्मचारी आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शारदा उगले- दहिभाते व आभार मु.अ.ईश्वर वाघ यांनी मानले.



**विठ्ठल मंदिर ते देहडकरवाडी दरम्यानचा पूलावरील रस्त्यावर खड्डेच खड्डे पडले असून या ठिकाणी पाणी साचत आहे. पाण्यामुळे खड्यांचा अंदाज येत नसल्यामुळे छोट-मोठे अपघात या ठिकाणी होत आहेत. (छायाचित्र किरण खानापुरे)**

# आमदार बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नातून परतुर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात सभा मंडप बांधकामाकरिता ५० लक्ष रुपये निधी

## श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात नवनिर्वाचित आमदार लोणीकर यांचा सत्कार



**परतूर । प्रतिनिधी -** परम पूज्य वंदनीय गुरुमाऊली मोरेदादा यांच्या संकल्पनेतून देशभरासह जगभरात चालू असलेलं कृषी व आरोग्य विषयी धोरण देशासह जगात उत्क्रांती निर्माण करील अशी धारणा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तथा परतुर विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर यांनी परतुर येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात व्यक्त केली. परतुर येथील स्वामी समर्थ सेवा केंद्रात भव्य सभा मंडप बांधण्याकरिता आमदार लोणीकरांच्या विशेष प्रयत्नातून सुमारे ५० लाख रुपये मंजूर झाल्याने श्री स्वामी समर्थ सेवेकरी बंधू-भगिनी यांच्या वतीने आयोजित नवनिर्वाचित आमदार लोणीकर यांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना यावेळी आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की श्री स्वामी समर्थ चा सेवेकरी म्हणून श्री स्वामी समर्थांची सेवा करण्याचे पुण्य मला लाभलं याचा मला गौरव आणि अभिमान वाटतो. श्री स्वामी समर्थांच्या कृपेने मी गेली ४० वर्ष राज्याच्या राजकारणात टिकून असून आठ वेळा परतुर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्याची संधी मला भारतीय जनता पक्षाने दिली यात मी पाचव्या महाराष्ट्र विधानसभेचा सदस्य आमदार म्हणून विजयी झालो असून मतदारसंघात केलेल्या सर्वांगीण विकास कामाच्या जोरावर मतदारसंघातील मतदारांनी मला भक्कम मतांनी विजयी केले आहे. श्री स्वामी समर्थांच्या कृपेने महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासाकरिता पुन्हा मला मंत्रिमंडळात काम करण्याची नक्कीच संधी मिळेल असा आत्मविश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

परतुर श्री स्वामी समर्थ सेवा केंद्र येथे नवनिर्वाचित आमदार बबनराव लोणीकर यांनी आरती व मनोभावे दर्शन घेतले, गुरुपीठ चे प्रतिनिधी अनिरुद्ध कातारे पाटील यांनी परमपूज्य गुरुमाऊलींचे कार्य आपल्या मार्गदर्शनातून विशद केले, सेवेकऱ्यांच्या वतीने लोणीकर यांचा भव्य सत्कार करण्यात आला, कार्यक्रमास पंचक्रोशीतील सर्व सेवेकरी माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या, कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवाजीराव पवार अशोक आमले वैभव कार्लेकर मीनाताई घुगे प्रियाताई कोल्हे यांनी परिश्रम घेतले.

# परतूर पोलिसांनी अवघ्या २४ तासात पकडली सोयाबीन चोरी करणारी टोळी



**परतूर । प्रतिनिधी -** येथील साईबाबा चौक येथील फिर्यादी नामे सुदर्शन प्रभाकर काथारे रा. चिंचोली यांचे गोडाऊन चे शटर उचकटून आत मध्ये ठेवलेले सोयाबीनचे २२ पोते किंमत ५०,४००/- माल अज्ञात आरोपीने चोरून घेऊन गेले बाबत पोलिस स्टेशन परतूर येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. पोलिसानी तपासाचे चक्रे तत्काळ फिरउन सदर गुन्ह्यातील आरोपीची गोपनीय माहिती काढून आरोपी करण सखाराम पवार वय २४ वर्ष रा. आनंदवाडी. गजानना प्रभू मोरे रा. आनंदवाडी वय ३० वर्ष रा. आनंदवाडी. महेश गणेश कातारे रा. चिंचोली मिळाली यांना ताब्यात घेऊन विचारपूस केली सदर आरोपीने मुद्देमाल स्वतः चे पिकिप मध्ये चोरून घेऊन गेले बाबत कबुल केले आणि सर्व मुद्देमाल काढून दिला आहे, चोरीचे सोयाबीन आणि पिकीप अशा एकूण ४,००,४००/- चा मुद्देमाल काढून दिला आहे तो जप्त करून आरोपीस अटक करून पी सी आर घेण्यात आला आहे, फिर्यादीस अर्ज करून मुद्देमाल परत देण्याची कारवाई पोलिस करीत आहेत, त्यामुळे चोरीस गेलेला मुद्देमाल परत मिळाला याचा आनंद फिर्यादस होत आहे. अजून बरेच गुन्हे उघडकिस येण्याची शक्यता आहे. सदरची कारवाई ही पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल,अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी चौरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक एम.टी.सुरवसे, पोलीस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे ,पोका/ सतीश जाधव, दीपक आडे,अच्युत चव्हाण, शामुअल गायकवाड, राम हाडे, दशरथ गोपणवाड, पोह/ अशोक गाढवे चालक धोत्रे यांनी यशस्वी केली आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.